## रे. मु. नं. ५३/२०१३ मधील निशाण ५ खालील आदेश

१) वादींनी निशाणी ५ वर प्रतिवादी नं. १ ते ३ विरूध्द तुर्तातुर्त ताकीदीसाठी अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर प्रतिवादी नं. १ व २ यांनी निशाणी ३८ अन्वये म्हणणे दाखल केलेले आहे. तर प्रतिवादी नं. ६ ते ८ यांनी निशाणी ४१ अन्वये म्हणणे दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी नं. ९ ते ११ यांनी निशाणी ४३ अन्वये पुरसीस दाखल करून निशाणी ४१ वरील म्हणणे स्विकृत केलेले आहे. प्रतिवादी नं. १३ यांनी निशाणी ५५ अन्वये म्हणणे दाखल केलेले आहे. तर प्रतिवादी नं. १४ ते १८ यांनी निशाणी ५९ वरील पुरसिस द्वारे निशाणी ५५ वरील म्हणणे स्विकृत केलेले आहे. वादी, प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील वाद प्रश्नांचे उत्तर कारणांसह देत आहे ते खालीलप्रमाणे.

| | **वाद प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | वादींनी प्रतिवादी नं. १ ते ३ विरूध्द प्रथमदर्शनी केस शाबित केलेले आहे काय ? | ... **होय** |
| २. | वादींनी पुढे शाबित केले आहे का की, केसचे बलाबल हे वादींच्या बाजुने आहे काय ? | ... **होय** |
| ३. | वादींनी पुढे शाबित केले आहे का, ताकीद अर्ज मंजुर न केल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे ? | ... **होय** |
| ४. | काय आदेश ? | ... **अंतिम आदेशानुसार** |

## का र ण मि मां सा

### वाद प्रश्न क्र. १ ते ३ चे उत्तर

२) वादींनी आपल्या अर्जामध्ये थोडक्यात कथन केलेले आहे ते

खालीलप्रमाणे देत आहे.

मौजे लवंग येथील गट नं. ५३६ मधील ५ हे. ४१ आर. (पो. ख. ४० आर.) ही दावा मिळकत आहे. वादीचे कथन की, वादी व प्रतिवादी नं. ५ ते १८ यांचे मुळ पुरूष गेणु उर्फ गेनबा सखाराम दुरापे हे दिनांक १२.०३.१९५७ रोजी मरण पावलेले आहेत. त्यांच्या वारसांची, फेरफार नं. ९८६ ने गांवच्या दप्तरी वारस म्हणुन नोंद झालेली आहे. गेनबा यास जगन्नाथ, पांडुरंग व पंढरीनाथ अशी तीन मुले वारस होती. जगन्नाथ हा थोरला होता व तो कुटुंबाचा कर्ता होता व तशी नोंद झालेली आहे. जगन्नाथ हा दोन वर्षापुर्वी मरण पावलेला आहे. प्रतिवादी नं. ५ ते ८ ही त्याची मुले आहेत व प्रतिवादी नं. ९ ते ११ ह्या मुली आहेत. पांडुरंग हे दिनांक १६.०१.१९९३ रोजी मरण पावलेले असुन वादी हे त्यांचे वारस आहेत. पंढरीनाथ हा सुध्दा मरण पावलेला आहे. त्यास प्रतिवादी नं. १२ ही पत्नी, प्रतिवादी नं. १३ व १४ ही मुले व प्रतिवादी नं. १५ ते १८ ह्या मुली आहेत.

३) वादींचे पुढे अर्जामध्ये कथन की, गेनबा याने दि. १३.०२.१९४३ साली मौजे लवंग येथील सर्व्हे नं. ९५/२, १८६/२ व १८७/१ या मिळकती दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने दि. बृहन्महाराष्ट्र सिंडिकेट लिमिटेड, पुणे या कंपनीला दिल्या होत्या. सदर जमिनी भाडेपट्टयाने दिल्यानंतर मयत जगन्नाथ याने कुटुंब कर्ता या नात्याने त्या मिळकतीचे भाऊ पांडुरंग व पंढरीनाथ यांच्यामध्ये सरसनिरस मानाने वाटप करून दिले. त्या वाटपात सर्व्हे नं. १९७/१ व ९५/२ ह्या जमिनी मयत जगन्नाथ याच्या हिश्यास आल्या. सर्व्हे नं. १८६/२ म्हणजेच दावा मिळकत गट नं. ५३६ ही वादीचे मयत वडिल पांडुरंग यांच्या हिश्याला आली. तर सर्व्हे नं. १८७/१ ही पंढरीनाथ यांच्या हिश्याला आली. तसा फेरफार नं. १०४३ करण्यात आला. तेंव्हापासुन ते वेगवेगळे राहु लागले, त्यांचे खाणे–पिणे व व्यवहार वेगवेगळे होवु लागले. दावा

मिळकत ही वादींच्या नांवे मालक म्हणुन नोंद झालेली होती व आहे. वादींनी दावा मिळकतीचा खंड घेतलेला आहे. सदर वाटप मान्य असल्यामुळे मयत जगन्नाथ, पांडुरंग व पंढरीनाथ यांनी हयातीमध्ये तक्रार केलेली नाही. एकदा मिळकतीचे वाटप झाल्यानंतर वाटपाचा अंमल झाल्यानंतर त्यावर मयत जगन्नाथ व पंढरीनाथ यांचा कोणताही हक्क संबंध राहिलेला नाही. दावा मिळकतीचा भाडेपट्टा हा मयत गेनबा याने दिला असला तरी त्यानंतर वाटप होवुन दावा जमिनी ह्या वादीच्या हिश्यास आलेल्या आहेत. यातील प्रतिवादी हे दावा जमिनीबाबत मयत गेनबा म्हणजेच मुळ खंडकरी यांचे कायदेशिर वारस होत नाहीत. त्यामुळे प्रतिवादी नं. ५ ते १८ यांचा दावा मिळकतीशी काही संबंध पोहोचत नाही.

४) वादीच्या अर्जातील पुढे कथन की, महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुळ खंडेकरीचे कायदेशिर वारस व मालक यांना नियमानुसार जमिनी परत करण्याची कारवाई सुरू केली. त्याप्रमाणे जमिन मागणीचे अर्ज मागविण्यात आले. तसा वादींनी अर्ज केलेला आहे. दावा मिळकत ही वादींच्या वडिलांना वाटपामध्ये मिळालेली असल्यामुळे तसा अर्ज केला. शासनाने तशी यादी जाहिर केली व त्यास मुदतीत हरकती मागवल्या. सदर मुदतीत कोणीही हरकत दिली नाही अगर न्यायालयात दावा दाखल केला नाही. त्यानंतर प्रतिवादी नं. ५ ते ८ यांनी ऑगस्ट २०१३ मध्ये हरकत घेतली. त्याची माहिती वादींना दिली नाही. त्याप्रमाणे प्रतिवादी नं. १ व २ यांनी कोणतीही चौकशी केली नाही. त्यांनी पुर्णपणे बेकायदेशिर प्रक्रिया अवलंबुन प्रतिवादी नं. २ यांनी प्रतिवादी नं. ५ ते १८ सोबत संगनमत करून त्यांच्या नांवाची नोंद करणारा आदेश दिनांक २१.०९.२०१३ रोजी पारित केला. तो आदेश चुकीचा व बेकायदेशिर आहे. त्या आदेशाद्वारे वादीचा हक्क डावलुन प्रतिवादी नं. ५ ते १८ यांचा हक्क निर्माण केलेला आहे. सदर आदेशाची

प्रतिवादी नं. १ ते ३ अंमलबजावणी करणार असुन प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी दि. ३०.१०.२०१३ रोजी दावा मिळकतीचा कब्जा देणार आहे. तसे केले तर वादींचा दावा दाखल करण्याचा हेतु नष्ट होणार आहे. शिवाय दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होणार असुन वहिवाटीवरून तक्रारी निर्माण होणार आहे. वादींच्या मालकी हक्काची जमिन जाणार आहे. अशा परिस्थितीत दिनांक २१.०९.२०१३ रोजी झालेल्या आदेशाप्रमाणे प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी कब्जा देवु नये यासाठी तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात यावा अशी वादींनी मागणी केलेली आहे.

५) प्रतिवादी नं. १ व २ यांनी निशाणी ३८ वर म्हणणे दाखल करून कथन केलेले आहे की, माजी खंडकरी व त्यांच्या कायदेश्यिार वारसांना शेती महामंडाळाच्या ताब्यातील जमिनी परत करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. त्यानुसार दिनांक १३.०४.२०१२ रोजी विहित नमुन्यात अर्ज वाटप करण्यात आले व दिनांक ३०.०४.२०१२ रोजी अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. सदर कालावधीमध्ये सर्जेराव पांडुरंग दुरापे यांनी दिनांक २८.०४.२०१२ रोजी व गोरख पांडुरंग दुरापे यांनी दिनांक २९.०४.२०१२ रोजी अर्ज दाखल केलेले होते. गोरख दुरापे यांनी सादर केलेल्या वंशवेल प्रतिज्ञापत्रानुसार वाटप आदेशामध्ये नांवे नोंद करण्यात आलेली आहेत. तसेच मौजे लवंग येथील जमिन वाटपाबाबतचा प्रारूप नमुना—३ ही यादी दि. १६.०७.२०१३ रोजी तहसिल कार्यालय, गाव चावडी व शेती महामंडळाच्या कार्यालयातील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली. त्यामध्ये हरकती असल्यास दिनांक ३१.०७.२०१३ रोजी पर्यंत उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डुवाडी तथा समिती प्रमुख क्र. ३ यांच्याकडे लेखी स्वरूपात दाखल करण्याचे कळविण्यात आले होते. त्यानुसार चंद्रशेखर जगन्नाथ दुरापे यांनी दि. २९.०७.२०१३ रोजी हरकत अर्ज दाखल केला. त्यानुसार दि. २१.०९.२०१३ रोजीचा वाटप

आदेश पारित करण्यात आला.

६) प्रतिवादी नं. ६ ते ९ यांनी निशाणी ४१ वर म्हणणे दाखल करून अर्जास विरोध केलेला आहे. या प्रतिवादींच्या अर्जामध्ये कथन की, सदर अर्ज हा चालण्यास पात्र नाही. वादींनी सदरचा दावा ठरावासाठी दाखल केलेला आहे. सदरची मागणी कलम ४१ सिलिंग कायद्यानुसार मागता येणार नाही. तसा या न्यायालयाला अधिकार नाही. वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयात आलेला नाही. वादींनी कुटुंबाची वंशवेल नमुद केलेली नाही. वादींनी तहसिलदार, माळशिरस यांच्याकडे महाराष्ट्र शेतजमिन (ज.धा.क.म.) (सुधारणा) अधिनियम २०११ च्या खंडकरी शेतक—यांना परत मिळण्याबाबत दिलेल्या अर्जामध्ये चुकीची वंशवेल नमुद केलेली आहे. मात्र माढा येथील चौकशी अधिकारी (प्रतिवादी नं. २) यांच्याकडे दिलेल्या प्रतिज्ञालेखात गेनु सखाराम दुरापे यांचे नांव नमुद केलेले आहे. वादींनी खोटी माहिती लबाडीने दिलेली आहे. वादींनी दाव्यात केलेली मागणी ही कलम ३३ सिलींग कायद्यानुसार अपील करण्याची तरतुद असताना खोटा दावा व अर्ज दाखल केलेला आहे. सबब तो नामंजुर करण्यात यावा.

७) या प्रतिवादींचे पुढे कथन की, दावा मिळकत ही मुळ गेनबा यांच्या मालकीची असुन त्यानी त्यांच्या हयातीमध्ये दि. १३.०२.१९४३ साली सर्व्हे नं. ९५/२, १८६/२ व १८७/१ ह्या मिळकती दि. बृहन्महाराष्ट्र सिंडीकेट लि. पुणे यांना भाडेपट्टयाने दिल्या होत्या. त्यानंतर पुढे जमिनी कमाल अतिरिक्त धारणा कायदा आल्याने त्या मिळकती महाराष्ट्र शासनाने प्रतिवादी नं. ४ यांना वर्ग करण्यात आल्या. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने शेती महामंडळ बरखास्त करून प्रतिवादी नं. ४ यांच्याकडील मिळकती मुळ खंडकरी अथवा त्यांचे कायदेशिर वारसांना देण्याचा आदेश करण्यात आला. त्यानंतर २०११

साली दुरूस्ती करून आदेशाप्रमाणे पुन्हा वाटप करण्यात यावे असे आदेश काढण्यात आले.

८) या प्रतिवादींचे पुढे कथन की, वादींनी सदर मिळकतीबाबत खोटी माहिती व प्रतिज्ञालेख देवुन फक्त वादीचाच हक्क आहे अशी मागणी केली. त्यास या प्रतिवादींनी हरकत घेतली. त्यावर प्रतिवादी नं. २ यांनी चौकशी करून वादी, प्रतिवादी यांचा हक्क मान्य करून त्यांच्या नांवाचा आदेश करण्यात आलेला आहे. सबब याठिकाणी प्रतिवादी नं. १ व २ यांनी सर्व कायदेशिर तरतुदींचे व महाराष्ट्र शासनाचा जमिन वाटप करण्याबाबतचा निर्णय योग्य आहे. जर ताकीद अर्ज वादींच्या बाजुने मंजुर केल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. उलटपक्षी मनाई आदेश मंजुर न केल्यास वादींचे काहीएक नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीस प्रथमदर्शनी केस नाही. केसचे बलाबल वादींच्या बाजुने नाही. सबब अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

९) प्रतिवादी नं. १३ ते १८ यांनी निशाणी ५५ वर म्हणणे दाखल करून अर्जातील संपूर्ण मजकुर नाकारलेला आहे. या प्रतिवादींचे कथन की, मुळ जमिन ही ग्यानबा यांची होती. त्यांनी सन १९४३ साली ती पुणे येथील बृहन्महाराष्ट्र कंपनीस भाडेपट्टयानी दिली. त्यावेळी राहिलेली मिळकत ही वादी, प्रतिवादी यांचे वडिल एकत्रात वहिवाट करीत होते. पुढे सन १९५९ साली सोयीसाठी सर्व्हे नं.९५/२ ही मिळकत जगन्नाथ यांच्या नांवे केली व सर्व्हे नं. १८७/१ ही पंढरीनाथ यांच्या नांवे केली व सर्व्हे नं. १८६/२ ही पांडुरंग यांच्या नांवे केली. पुढे भाडेपट्टयाने दिलेल्या मिळकतीपैकी जगन्नाथ यांच्या नांवे असलेली सर्व्हे नं. ९५/२ ही विक्री केली व त्या बदल्यात ७ एकर जमिन ही समाईकात तिघां भावात खरेदी केली. पुढे तिघेही

एकत्र राहत होते. त्यांच्यात अद्यापही वाटप झालेले नाही. त्यांचे सन १९९० च्या सुमारास वाटप झाले व वाटपापासुन ते वेगवेगळे राहु लागले. दावा मिळकत ही सोयीसाठी फेरफार नं. १०४३ ने वादीच्या वडिलांच्या नांवे नोंदविले असले तरी त्यावेळी त्याचे वाटप झालेले नव्हते. एकत्र कुटुंब अखंड होते. त्यामुळे दावा मिळकत ही एकत्र कुटुंबाची एकत्र मिळकत आहे. दावा मिळकतीचे वाटप झालेले नाही. दावा मिळकत ही वादीच्या वाटेस आल्याचे खोटे सांगुन खोटा दावा केलेला आहे. त्यामुळे वादींचा हा अर्ज चालण्यास पात्र नाही तो खर्चासह फेटाळण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

१०) वादी, प्रतिवादी यांची कथने व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादातीत नसलेल्या गोष्टी प्रथम विचारात घेणे आवश्यक वाटते. प्रथमत: वादी व प्रतिवादी नं. ५ ते १८ यांच्यामध्ये असलेले नातेसंबंधाबाबत कोणताही वाद नाही. याठिकाणी सर्व्हे नं. ९५/२, १८६/२, १८७/१ या मिळकती वादी, प्रतिवादी यांचे आजोबा गेनबा यांनी दिनांक १३.०२.१९४३ साली दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने दि. बृहन्महाराष्ट्र सिंडीकेट लि., पुणे यांना दिल्या होत्या. त्याचा करार याठिकाणी दाखल केलेला आहे. तसेच पुढे सदर दावा मिळकत ही वादीचे वडिल व त्यांच्या मृत्युनंतर वादींच्या नांवे आल्याचे दिसुन येते. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने मुळ खंडकरी व त्यांच्या वारसांना जमिन परत करण्याचा आदेश पारित केलेला आहे. त्यानंतर वादी कि प्रतिवादी वारस, यासंबंधीत प्रतिवादी नं. २ यांनी आदेश पारित केलेला आहे आणि तो आदेश याठिकाणी आव्हानित केलेला आहे. यावरील मान्य व वादातीत नसलेल्या गोष्टींवरून वादी यांनी त्यांच्या बाजुने केस शाबित केले आहे का ? हे पाहणे आवश्यक आहे.

११) अर्जदारांच्या अर्जामध्ये कथन की, दावा मिळकत ही वादीचे वडिल

पांडुरंग आणि त्यांचे भाऊ पंढरीनाथ व जगन्नाथ यांच्यामध्ये वाटप होवुन दावा मिळकत ही वादींच्या वडिलांच्या नांवे आलेली आहे. त्याचा फेरफार नं. १०४३ घेण्यात आलेला आहे. सदर वाटपामध्ये जगन्नाथ हा एकत्र कुटुंब कर्ता होता आणि त्यानी जमिनीचे वाटप करून दिले, त्यानुसार जगन्नाथ यास सर्व्हे नं. १९७/१, ९५/२ आले तर वादीचे वडिल पांडुरंग यास सर्व्हे नं. १८६/२ (गट नं. ५३६) दावा मिळकत ही वाटपात आली. तर पंढरीनाथ यांना सर्व्हे नं. १८७/१, ही जमिन देण्यात आली. त्यानुसार ७/१२ सदरी अंमल होवुन ते भाऊ वेगवेगळे राहु लागले असे वादींचे कथन आहे. या कथनाविषयी प्रतिवादी नं. ५ ते ११ यांनी आपल्या म्हणण्यामध्ये त्या वाटपाबाबत काहीही उल्लेख केलेले नाही. परंतु प्रतिवादी नं. १२ ते १८ यांनी दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये दावा मिळकतीचे वाटप झालेले नाही व सन १९९० साली पंढरीनाथ, पांडुरंग व जगन्नाथ यांच्या वारसांचे वाटप झालेले आहे, अशाप्रकारचे कथन केलेले आहे. यावरील अनुषंगिक गोष्टींचा विचार करता ग्यानबा हे दिनांक १२.०३.१९५७ रोजी मरण पावलेले आहेत. त्यानंतर त्यांची तीन मुले अनुक्रमे जगन्नाथ, पांडुरंग व पंढरीनाथ यांच्या नांवाची नोंद झाली. त्यानंतर तिघेही मरण पावलेले आहेत. याठिकाणी दिनांक १३.०२.१९४३ रोजी दिलेल्या भाडेपट्‌टयाचे अवलोकन केले असता त्याठिकाणी भाडेपट्‌टयानुसार दावा मिळकत व इतर मिळकती ह्या भाडेपट्‌टयाने पुणे येथील कंपनीस देण्यात आलेल्या आहेत. मिळकतीचा कब्जा हा त्या कंपनीला दिला गेला असल्याचे दिसुन येते. त्या भाडेपट्‌टयाच्या करारामधील पान नं. ३ मधील ओळ नं. १३ चे अवलोकन केले असता 'मालकी ही मुळ मालकाकडे राहिलेली आहे व शर्ती, अटीवरती कब्जा हा पुणे येथील कंपनीला देण्यात आलेला आहे' असे दिसुन येते. यावरून असे स्पष्ट होते की, मालकी ही मुळ मालकाकडे राहिली परंतु कब्जा

हा कंपनीकडे गेलेला आहे. या गोष्टींचा विचार करता वादींनी कथन केलेल्या वाटपाच्या फेरफाराचे अवलोकन करणे आवश्यक आहे. फेरफार नं. १०४३ चे अवलोकन केले असता त्यामध्ये असे स्पष्ट होते की, तो फेरफार हा दिनांक १६.०२.१९५९ रोजी जगन्नाथ याने त्यांचे दोन्ही भाऊ पंढरीनाथ व पांडुरंग यांच्या नांवे जमिन वाटप करून दिलेले आहेत. त्यामध्ये सर्व्हे नं. १८७/१, १८६/२, १९७/१ व ९५/२ अशा जमिनींची वाटप करण्यात आलेले आहे. त्यामध्ये दाव्यातील मिळकत सर्व्हे नं. १८६/२ ही वादींचे वडिल पांडुरंग यांना देण्यात आलेली आहे व इतर मिळकती ह्या प्रतिवादी नं. ५ ते १८ यांचे पुर्वज पंढरीनाथ व जगन्नाथ यांना देण्यात आल्याचे दिसुन येते. याठिकाणी सदर वाटप करतेवेळी सदर मुळ मालकांना मालकी होती, परंतु कब्जा नव्हता असे एकंदरीत दाखल कागदपत्रांवरून दिसुन येते. याठिकाणी सदर फेरफाराबाबात आजपर्यंत कोणीही आव्हानित केलेले नाही अथवा नाकारलेले नाही. त्यामुळे त्यातील नोंदी ह्या ख—या व बरोबर आहेत असे गृहित धरण्यास कोणतीही अडचण असल्याचे दिसुन येत नाही.

१२) याठिकाणी या वरील सर्व गोष्टींचा विचार करता महत्वाचा मुद्दा याठिकाणी उपस्थित झालेला आहे की, सदर दावा मिळकत ही बृहन्महाराष्ट्र सिंडीकेट लि., पुणे यांच्याकडुन सिलींग कायद्याअंतर्गत अतिरिक्त झाल्यामुळे ती प्रतिवादी नं. ४ यांना वर्ग करण्यात आली. यासंबंधी प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी युक्तिवाद केला की, 'सदर मिळकतीबाबत मालकी ही सिलिंग कायद्यानुसार सरकारला देण्यात आली, त्यामुळे वादींच्या पुर्वजांना फेरफार नं. १०४३ ने वाटप करण्याचा अधिकार राहिला नव्हता, यासंबंधीत विचार करता मालकी राहिली होती का नव्हती हे पाहत असताना सन १९४३ च्या भाडेकरारानुसार कब्जा फक्त पुणे येथील कंपनीच्या नांवे गेला होता, मालकी ही मुळ खातेदाराचीच राहिली होती. म्हणजेच सन १९५९ रोजी मुळ खातेदार

हेच मुळ मालक होते. याठिकाणी प्रतिवादींच्या कथनानुसार ती सिलिंग कायद्यानुसार दावा मिळकत ही सरकारच्या नांवे करण्यात आली व नंतर ती प्रतिवादी नं. ४ यांना देण्यात आलेली आहे, अशाप्रकारचे कथन करण्यात आलेले आहे. परंतु कथनामध्ये कोणत्या वर्षी केली याचा उल्लेख नाही अथवा ती कोणत्या फेरफाराने नोंद करण्यात आली यासंबंधी कोणताही दस्त, कागदपत्र हजर केलेला नाही. महाराष्ट्रातील सिलींग ॲक्ट हा सन १९६१ साली करण्यात आलेला आहे. त्यानंतर कधी जमिन संपादित करण्यात आली, वर्ग करण्यात आली या संबंधी कोणताही ठोस असा पुरावा याठिकाणी दिसुन येत नाही. जर तसे ठोस कथन अथवा पुरावा आला असता तर दावा मिळकत कशाप्रकारे संपादित झाली, कोणाकडुन संपादित झाली यासंबंधी प्रकाश टाकता आला असता. परंतु यासंबंधी काहीएक पुरावा आलेला नाही. त्यामुळे याठिकाणी दावा मिळकत ही पूर्वीपासुन वादींच्या व वादींच्या पुर्वजांच्या नांवावर होती असे दिसुन येते. त्यानंतर सन १९५९ पासुन ते २०१३ पर्यंत प्रतिवादी नं. ५ ते १८ अथवा त्यांचे पुर्वज यांनी कोणत्याही प्रकारे हरकत घेतल्याचे कथन केलेले नाही. तसेच त्यांच्या नांवाची नोंद दावा मिळकतीमध्ये दिसुन येत नाही. यावरून असे स्पष्ट होते की, दावा मिळकत ही वादी व वादींच्या पुर्वजांना वाटपामध्ये मिळाली असल्याचे वादीतर्फे ठोस असा पुरावा हजर केलेला आहे. त्यामुळे याठिकाणी प्रतिवादींचे कथन की, दावा मिळकत ही एकत्रात आहे, वाटप झालेले नाही, यासंबंधी कोणताही कागदोपत्री ठोस पुरावा आलेला नाही. त्यामुळे याठिकाणी वादींची बाजु भक्कम असल्याचे दिसुन येते.

१३) याठिकाणी वरील गोष्टींचा विचार करता वादी कथन करतात त्याअनुषंगाने दावा मिळकत ही वादी व वादींच्या पुर्वजांना वाटपामध्ये आली होती आणि त्यानंतर ती पुढे प्रतिवादी नं. ४ यांच्याकडे आली असल्याचे दिसुन

येते. त्यामुळे दावा मिळकतीवर वादींची मालकी असल्याबाबतचा ठोस पुरावा आला आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं. २ यांनी आदेश पारित केलेला आहे. त्या आदेशाबाबत दावा अंतिमरित्या चालविल्यानंतरच गुणदोषावर निर्णय होणार आहे. याठिकाणी दावा मिळकतीबाबत वादी यास कलम ४१ सिलींग ॲक्ट १९६१ मधील तरतुदीनुसार दावा करता येत नाही, असा युक्तिवाद प्रतिवादींच्यातर्फे करण्यात आला. त्यासंबंधी कलम ४१ वरील तरतुदींचे अवलोकन करता कलम २७ नुसार जर त्या कायद्यातील कारवाई झाली असेल तर दिवाणी न्यायालयास अधिकार येत नाही' असे नमुद केलेले आहे. यासाठी प्रतिवादींचे कथन की, वादींनी कलम ३३ नुसार प्रतिवादी नं. २ यांनी केलेल्या आदेशाविरूध्द अपिल करणे आवश्यक असताना अपिल केलेले नाही. त्यामुळे सदरचा दावा या न्यायालयामध्ये चालु शकत नाही, असा युक्तिवाद केलेला आहे. यासंबंधी वादींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद की, सदर आदेश पारित करतेवेळी जर सदर आदेश हा कायदेशिर नसेल तर तो आव्हानित करण्याचा अधिकार वादीस आहे आणि वादींचा दावा चालण्यास पात्र आहे. यासंबंधी वादीतर्फे काही न्यायनिर्णय हजर केलेले आहेत. त्या न्यायनिर्णयाबाबत विचार करता वादींचे कथन की, या न्यायालयास आदेश आव्हानित करण्याचा अधिकार आहे. यांसबंधी वादींनी खालील न्यायनिर्णयावर विसंबुन राहु इच्छितात. वादींतर्फे *State of Maharashtra V/s. Chintal Maisayya S/o. Mallayya, All MR 2011* या न्यायनिर्णयामध्ये सिलिंग कायद्यातील कलम ४१ नुसार दिवाणी न्यायालयास दावा चालविण्याचा अधिकार प्राप्त होतो का ? यासंबंधी मत व्यक्त केलेला आहे. त्यामध्ये गृहित धरण्यात आलेले आहे की, दिवाणी न्यायालयास दावा चालविण्याचा अधिकार आहे. या अनुषंगाने वादींतर्फे *Rajendra Sheshrao Shendge V/s. Shobhatai S. Ravate, AIR 2007 Bombay 90* दाखल करण्यात आलेला आहे. या न्यायनिर्णयामध्येही असे मत

व्यक्त केलेले आहे की, दिवाणी न्यायालयाला अभिप्रेतपणे दावा चालविण्यास विरोध केलेला असेल तरच दिवाणी न्यायालय हे दावा चालवु शकत नाहीत. याठिकाणी वरील न्यायनिर्णय व सद्यपरिस्थितीचा विचार करता असे स्पष्ट होते की, दिवाणी न्यायालयास दाखल दावा चालविण्याचा अधिकार प्राप्त होतो.

१४) याठिकाणी वरील कारणमिमांसेमध्ये सविस्तरपणे केलेल्या चर्चेचा विचार करता वादी यांनी आपल्या कागदोपत्री पुराव्याच्या आधारे शाबित केलेले आहे की, सन १९५९ रोजी फेरफार नं. १०४३ नुसार दावा मिळकत ही वादींच्या वडिलांच्या नांवे वाटपात आली होती, त्यानंतर ती मिळकत वादी व वादींच्या पुर्वजांच्या नांवाने नोंद राहिलेली आहे. याठिकाणी ७/१२ सदरी प्रतिवादी अथवा प्रतिवादींच्या पुर्वजांची कोठेही नोंद आलेली नाही. त्या नोंदीबाबत प्रतिवादी नं. ५ ते १८ यांनी आव्हानित केलेले नाही. यावरून सदर मिळकत ही वादींच्या मालकी वहिवाटीची आलेली आहे. ती मिळकत सरकारकडे गेल्यानंतर प्रतिवादी नं. ४ कडुन वादीस मिळण्याचा अधिकार प्राप्त होतो. यासबंधी प्रतिवादी नं. २ यांनी दिलेला आदेश हा या दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत स्थगित ठेवणे योग्य व न्यायिक असे होणार आहे. असे न केल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. जर वादीचा ताकीद अर्ज मंजुर न केल्यास वादीस त्यांच्या हक्कापासुन मुकावे लागणार आहे. याठिकाणी वादींचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही. याठिकाणी वादींनी प्रथमदर्शनी केस शाबित केलेले आहे. केसचे बलाबल हे वादींच्या बाजुने आहे. अपरिमित नुकसान हे ताकीद अर्ज नामंजुर केल्यास वादींचे होणार आहे. त्यामुळे या व वरील सर्व कारणांस्तव वाद प्रश्न क्र. १ ते ३ चे उत्तर 'होय' असे देत आहे.

**<u>वाद प्रश्न क्र. ४ चे उत्तर</u>**

१५) या वाद प्रश्नाच्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादीचां निशाणी ५ वरील तुर्तातुर्त अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. या आदेशाद्वारे प्रतिवादी नं. १ ते ३ यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते की, दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत स्वत: अगर इतरांमार्फत दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी नं. ५ ते १८ यांना देण्यात येवु नये.

३. खर्चाबाबत वेगळा आदेश नाही.

( **एस. एस. इंदलकर** )
दिनांक : ३१.०७.२०१५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
माळशिरस.